**प्रेसनोट** दि. ०६/०३/२०२६

आरोपी लोकसेवक १) श्रीमती विजया महारूद्र नाईक, वय- ४५ वर्षे, पद- मंडळ अधिकारी, नेमणुक- संगेवाडी मंडळ, तहसिल कार्यालय सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर, रा. प्लाट नं.१३, सहयाद्री नगर, इसबावी, पंढरपूर, जि. सोलापूर २) वैभव पिराजी मोरे, वय २८ वर्षे, रा. मुंढेवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या आईच्या नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीच्या खरेदी दस्तास प्राप्त हरकतीचे निकाल लावून खरेदीची नोंद ग्राह्य धरून सातबारा उताऱ्यावर तक्रारदार यांच्या आईचे नाव लावून देण्यासाठी आरोपी क्र.२ याने आरोपी क्र. १ यांचे करीता तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ७०००/- रू मागणी केली तसेच आरोपी क्र. १ यांनी आरोपी क्र. २ यांचे लाचमागणीस प्रोत्साहन दिले व सदर लाच रक्कम आरोपी क्रमांक २) वैभव पिराजी मोरे यांनी आलोसे क्र.१ श्रीमती विजया महारूद्र नाईक यांच्यावतीने स्वीकारले म्हणून गुन्हा नोंद

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| **पोलीस ठाणे/गुन्हा नोंदक्रमांक** | सांगोला पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंदकरण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ अ व १२ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | १) श्रीमती विजया महारूद्र नाईक, वय- ४५ वर्षे, पद- मंडळ अधिकारी, नेमणुक- संगेवाडी मंडळ,तहसिल कार्यालय, सांगोला, ता.सांगोला,जि.सोलापूर, रा. प्लाटनं. १३, सहयाद्री नगर, इसबावी, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर,<br>२) वैभव पिराजी मोरे वय २८ वर्षे, रा. मुंढेवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ७,०००/- रुपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ७,०००/- रुपये. |
| **पडताळणी दिनांक** | पडताळणी कारवाई- ०५/०३/२०२६ रोजी, |
| **सापळा दिनांक** | यशस्वी सापळा कारवाई दि. ०५/०३/२०२६ रोजी |
| **सापळा अधिकारी** | श्री. रविंद्र लांभाते, पोलीसनिरीक्षक, एसीबी, सोलापूर |
| **तपास अधिकारी** | श्री. शैलेश पवार, पोलीसनिरीक्षक, एसीबी, सोलापूर. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांच्या आईचे नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीच्या खरेदी दस्तावर प्राप्त हरकतीचे निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावून तक्रारदार यांच्या आईचे नावे केलेल्या खरेदीची नोंद ग्राह्य धरून त्यांचे नाव सातबारा उताऱ्यावर लावण्यासाठी मंडल अधिकारी श्रीमती विजया महारूद्र नाईक हे तक्रारदार याचे सोबत पंचासमक्ष पडताळणी दरम्यान कामासंबंधी बोलुन बाकी बोलणी त्यांचे खाजगी वाहन चालक आरोपी क्र.२ वैभव पिराजी मोरे यांचेशी करण्यास सांगितले त्यावेळी आरोपी क्र.२ वैभव पिराजी मोर याने तक्रारदार यांना सदर कामाचे आरोपी क्र. १ यांचे करीता तडजोडीअंती ७०००/- रू. लाचेची मागणी करुन लाच रक्कम लवकर घेवुन येण्यास सांगितले. श्री वैभव पिराजी मोरे यांनी मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांच्यावतीने केलेल्या लाच मागणीबाबत श्रीमती नाईक यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी त्यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे यांनी केलेल्या लाच मागणीस दुजोरा देऊन अपराधास प्रोत्साहन दिले. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांचे खाजगी वाहनाचे चालक श्री वैभव मोरे यांनी तक्रारदार यांच्याकडून ७०००/- रू लाचेची रक्कम स्वतः स्वीकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. |

**सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे मो.क्र ९८२३१६७१५४, श्री. अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ९०२९०३०५३०, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर, रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर, पोलीस अंमलदार संतोष नरोटे, गजानन किणगी, प्रियंका गायकवाड, अक्षय श्रीराम सर्व नेमणुक एसीबी सोलापूर यांनी केली.**

**लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देणेसाठी कायदेशीर फी व्यतरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांनी केले आहे.**

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन चौक, सोलापूर.
**संकेतस्थळ-** www.acbmaharashtra.gov.in
**ई मेल-**www.acbwebmail@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार अ‍ॅप-**acbmaharashtra.net
**टोल फ्री क्रमांक-** १०६४
**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८
**व्हॉटसअ‍ॅप क्रमांक-**९४०४००१०६४

सहा.पो.आयुक्त/पोलीस उप अधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर. सत्यमेव जयते

6/3/26
(प्रशांत चौगुले)
सहा. पोलीस आयुक्त / पोलीसउप अधीक्षक
अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो, सोलापूर